MHPU180016902015

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :– | २२/०९/२०१५ |
| नोंदणी तारीख | :– | २२/०९/२०१५ |
| निकाल तारीख | :– | ०७/०७/२०२६ |
| कालावधी | :– | **वर्षे महिने दिवस**<br>१० ०९ १५ |

**(भाग – "अ")**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.५, दौंड यांचे न्यायालयात, ता. दौंड, जि. पुणे**

(पिठासीन अधिकारी : श्रीमती एस.एन.निकम)

नियमित फौजदारी खटला क्र.२१२/२०१५ **निशाणी क्र.२४**

**(पोलीस ठाणे दौंड, गु.र.नं.३५१/२०१४)**

फिर्यादी :- महाराष्ट्र सरकार तर्फे,
पोलिस ठाणे अंमलदार,
दौंड पोलीस स्टेशन

सरकारतर्फे सादरकर्ते :– सहा. सरकारी अभियोक्ता
श्रीमती के.बी. भोसले

… . **विरुध्द** … .

आरोपी :– सुनिल बापू सांगळे,
वय– २५ वर्षे, व्यवसाय – ड्रायव्हर,
रा. बिरोबावस्ती, ता. दौंड, जि. पुणे

आरोपीतर्फे सादरकर्ते :– विधीज्ञ श्री. एस.एस.गावडे

**(भाग – "ब")**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १६.१२.२०१४ |
| प्रथम खबर अहवाल नोंदणीची तारीख | १६.१२.२०१४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १९.०८.२०१५ |
| पुरावा आरंभ केल्याची तारीख | १५.१०.२०१८ |
| ज्या दिवशी न्यायनिर्णय राखुन ठेवला ती तारीख | ०७.०७.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | ०७.०७.२०२६ |
| शिक्षा झाली असेल तर ती तारीख | ---- |

**आरोपीचा तपशिल**

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक केल्याची तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेली कलम | निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | शिक्षेत सुट दिलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुनिल बापू सांगळे | १९.१२.२०१४ | २०.१२.२०१४ | भा.दं.वि.कलम ३७९, गौ.ख. २१(४), पर्यावरण अधिनियम ९ व ५ | निर्दोष | - | - |

**(भाग - "क")**

**अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदारांची नावे | साक्षीदारांचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| १ | अशोक केशव बंड | घटनास्थळ जप्ती पंच | २२ |

आरोपीतर्फे कोणताही पुरावा देण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपीतर्फे पुरावा नाही.

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी नंबर दिलेल्या कागपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

**"ड" - गुन्हयातील जप्त वस्तु / मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २१३/२०१४ | एक लाल रंगांचा ट्रक नं. MH 42/B/9260 त्यामध्ये २ ब्रास वाळूने भरलेला. |

**न्या य नि र्ण य**

**(दिनांक ०७/०७/२०२६ रोजी पारीत)**

सदर खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे ३७९ गौ.ख. २१(४), पर्यावरण अधिनियम ९ व ५ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाच्या खटल्याची संक्षिप्त हकीकत पुढील प्रमाणे :**

**०२.** दिनांक १६/१२/२०१४ रोजी सायंकाळी २१.३० वाजण्याच्या मौजे – लोणारवाडी, ता. दौंड, जि. पुणे येथे आरोपी त्याच्या ताब्यातील एक लाल रंगांचा ट्रक नं. MH 42/B/9260 ट्रकमध्ये भीमा नदीपात्रातील अवैध वाळु उपसा करुन त्याची चोरी करताना दिसून आले. त्यामुळे आरोपीने वाळु चोरी केल्याबाबत प्रस्तूतची फिर्याद फिर्यादीने दाखल केलेली आहे.

**०३.** सदरील खबरीनुषंगे दौंड पोलिसांनी गुन्हा नोंदणी क्र.३५१/२०१४, भा.दं.वि. कलम ३७९ गौ.ख. २१(४), पर्यावरण अधिनियम ९ व ५ अन्वये नोंदवुन, पुढील तपासकाम पोलिस उपनिरीक्षक,डी.एस.कुलकणी यांच्याकडे सुपूर्द केला. तपास अधिका–याने तपासादरम्यान घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, साक्षीदाराचे जबाब नोंदविले, आरोपीला अटक केली. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्यामुळे भा.दं.वि. कलम ३७९ गौ.ख. २१(४), पर्यावरण अधिनियम ९ व ५ कलमानुषंगे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

**०४.** दिनांक ११.१०.२०१८ रोजी आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९ गौ.ख. २१(४), पर्यावरण अधिनियम ९ व ५ नुसार खालील आरोपासाठी नि.क्र.११ वर दोषारोप निश्चित करण्यात आला. उपरोक्त वेळी आरोपीला दोषारोप त्यांचे मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपीने त्यास नकार देऊन संपरिक्षेची मागणी केली.

**०५.** आरोपीविरुध्द अभियोगपक्षाच्या तसेच साक्षीदाराच्या पुराव्यात कुठलाही पुरावा मिळून न आल्याने आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही. तसेच अभियोगपक्षास पुरेशी संधी देऊनही ते इतर साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेऊ शकले नाहीत. म्हणून दिनांक १०.०६.२०२६ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**०६.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती के.बी. भोसले व आरोपीतर्फे श्री. एस.एस.गावडे यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोगपक्षाच्या खटल्यातील कथनांवरुन खालील मुद्दे काढण्यात आले व त्याचे निष्कर्ष कारणेमिमांसेसहित खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १६/१२/२०१४ रोजी सायंकाळी २१.३० वाजण्याच्या मौजे – लोणारवाडी, ता. दौंड, जि. पुणे येथील गावच्या हद्दीत भिमा नदी पात्रातील शासनाची २ ब्रास वाळु आरोपीने बेकायदेशिरपणे | |

| | | |
|---|---|---|
| | लबाडीच्या इराद्याने, फिर्यादीच्या संमती शिवाय मुद्दाम वाळु चोरुन नेल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **...नकारार्थी** |
| २. | वर नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपीने शासनाची परवानगी न घेता वाळुचे उत्खनन करुन वाहतुक केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **...नकारार्थी** |
| ३. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने शासनाने घालुन दिलेल्या अटींचे उल्लंघन करुन अवैधरीत्या विनापरवाना वाळुची चोरी करुन त्याच्या वाहनातुन वाहतुक करुन पर्यावरणाचे नुकसान केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **...नकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ साठी</u> :–**

०७. भारतीय दंड संहिता कलम ३७९, पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५, २१ आणि गौण खनिज उत्खनन अधिनियम कलम २१ अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणेसाठी कलम ३७८ मधील नमुद आवश्यक बाबी अभियोगपक्षाने निःसंशयपणे सिध्द करणे आवश्यक आहे. भा.दं.वि. कलम ३७८ पुढीलप्रमाणे –

*''जो कोणी कोणत्याही व्यक्तीच्या कब्जातुन कोणतीही जंगम मालमत्ता, त्या व्यक्तीच्या संमतीवाचुन अप्रामाणिकपणे घेऊन जाणेचे उद्देशाने, तशी ती घेता यावी यासाठी स्थान भ्रष्ट करतो, त्याला तो 'चोरी करतो' असे म्हटले जाते''.*

०८. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी जप्ती पंच साक्षीदार क्र.१ यांना तपासले. सदर साक्षीदाराने त्यांचे पुराव्यात असे कथन केले आहे की, त्यांना दिनांक १७/१२/२०१४ रोजी दौंड पोलीसांनी बोलवले होते. परंतु ते त्यांच्यासोबत जप्ती पंचनामा करण्याकरीता गेलो नव्हते. त्यादिवशी पोलिसांनी त्यांच्यासमक्ष कोणताही मुद्देमाल जप्त केला नाही. त्यांनी पोलिस स्टेशनला तयार पंचनाम्यावर सही केली. सदर साक्षीदारास जप्ती पंचनामा दाखविला असता त्यांनी त्यावरील सही ओळखली परंतु मजकुराबाबत काही माहित नसल्याचे

कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने सरकारी वकीलांनी सदर साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारले. परंतु, उलटतपासामध्ये देखील सदर साक्षीदाराने घटनास्थळ पंचनामा सिध्द होण्याइतपत कोणतेही कथन केले नाही.

**०९.** प्रस्तुत प्रकरणामध्ये संधी देवूनही अभियोग पक्षाने महत्वाचे साक्षीदार तपासले नाहीत. स्वतः घटनास्थळ जप्ती पंचाने त्यांच्यासमक्ष पंचनामा झाल्याचे नाकारलेले आहे. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. तसेच आरोपीने ट्रकच्या सहायाने वाळु चोरी केली, हे प्रत्यक्ष पाहिल्याचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने वाळुची चोरी करुन त्यांच्या ट्रकमधुन वाळुची वाहतुक केल्याबाबत पुरावा अभिलेखावर आलेला नाही. फौजदारी कायद्याप्रमाणे आरोपीविरुध्दचे आरोप हे निःसंशयपणे सिध्द करणे हे अभियोगपक्षाची जबाबदारी आहे व जोपर्यंत अभियोगपक्ष ते निःसंशयपणे सिध्द करत नाहीत तोपर्यंत आरोपी हा निर्दोष समजला जातो. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीने ट्रकच्या सहायाने वाळु चोरुन नेल्याचे सिध्द करणे आवश्यक होते. परंतु, अभियोगपक्षातर्फे साक्षीदाराच्या पुराव्यातून सिध्द केलेले नाही. तसेच आरोपीने नेमकी किती वाळु चोरी केली, याबाबतही कोणताही पुरावा साक्षीदाराच्या साक्षीमध्ये आलेला नाही. त्यामुळे आरोपीनेच चोरी केली, हे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे संशयाचा फायदा मिळण्यास आरोपी पात्र ठरतात. सबब, **मुद्दा क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.**

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबत</u> :–**

**१०.** प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमाल एक लाल रंगांचा ट्रक नं. MH 42/B/9260 ट्रक यांचा ताबा या अगोदरच सुप्रूतमान्याद्वारे देण्यात आलेला आहे. वर नमूद चर्चा, निरीक्षण आणि निष्कर्ष पाहता अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरले, त्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. **सबब, मुद्दा क्रमांक ४ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.**

## :: आदेश ::

१. **आरोपी** सुनिल बापू सांगळे यांस भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३७९, गौण खनिज उत्खनन अधिनियम कलम २१(४) आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९,५ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या दोषारोपांतून फौजदारी प्रक्रिया

संहिता १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक जातमुचलका (बंधपत्र) व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रु.१५,०००/– रुपयाचे जामीन कदबा लिहून द्यावा.

४. जप्त मुद्देमाल एक लाल रंगांचा ट्रक नं. MH 42/B/9260 ट्रक यांचा ताबा सुप्रूतनाम्याद्वारे मुळ मालकास दिलेला आहे, तो अपील कालावधीनंतर कायम करण्यात येत आहे.

५. प्रकरणातील दोन ब्रास वाळु अपील कालावधीनंतर संबंधित तहसिल कार्यालय यांच्याकडे पुढील कार्यवाहीस्तव जमा करण्यात यावी.

६. या न्यायनिर्णयाची प्रत जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ अन्वये फिर्यादीस सदर न्यायनिर्णयातील निष्कर्ष कळविण्यासाठी पाठविण्यात यावी.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय जाहीर व उध्दोषित करण्यात आला.)

NIKAM SNEHAL NIVASRAO
Digitally signed by NIKAM SNEHAL NIVASRAO
Date: 2026.07.07 15:50:25 +0530

दौंड.
दिनांक :- ०७/०७/२०२६.

(श्रीमती एस.एन.निकम)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.५, दौंड

**<u>C E R T I F I C A T E</u>**

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | A.I.Patel |
| Court name | : | Hon'ble S.N. Nikam<br>Judicial Magiatrate First Class,<br>Court No.5, Daund |
| Date of order | : | 07.07.2026 |
| Order signed by<br>Presiding Officer on | : | 07.07.2026 |
| Order uploaded on | : | 07.07.2026 |